॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon



जनसंपर्क विभाग

जळगाव, दि. २९ ऑक्टोबर : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात सुरु असलेल्या आंतर महाविद्यालयीन युवक महोत्सव 'युवारंग २०२६' आणि दिव्यांग कला महोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी विद्यार्थ्यांनी विविध कलाविष्काराचे प्रभावीपणे सादरीकरण केले. दुष्काळाची भीषण वास्तवता, महागाई अशा ज्वलंत विषयांवर सादरीकरण करत विद्यार्थ्यांनी उपस्थितांचे लक्ष वेधले.

विद्यापीठाच्या निसर्गरम्य वातावरणात सुरु असलेल्या युवक महोत्सवात भारतीय लोकसंगीत वाद्यवृंद, भारतीय समुहगान, भारतीय शास्त्रीय गायन – एकल, पाश्चिमात्य वाद्यसंगीत – एकल, पाश्चिमात्य गायन – एकल, वादविवाद स्पर्धा, चिकट कला, माती कला, स्थळ छायाचित्र स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पकतेने कौशल्याचे दर्शन घडवत उपस्थितांची मने जिंकली.

रंगमंच क्र. १ महात्मा फुले सभागृहात भारतीय लोकसंगीत वाद्यवृंद, भारतीय समुहगान स्पर्धेत विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या सूर ताल आणि लयचा त्रिवेणी संगम अनुभवयाला मिळाला. समुह गाण्यातून एकात्मतेचे दर्शन घडले. या स्पर्धेत २६ संघ सहभागी होते.

रंगमंच क्र. २ डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहात भारतीय शास्त्रीय गायन – एकल, पाश्चिमात्य वाद्यसंगीत – एकल, पाश्चिमात्य गायन – एकल या प्रकारात विद्यार्थ्यांनी केलेल्या सादरीकरणातून संगीताच्या विविध पैलूंचे प्रकटीकरण झाले. या स्पर्धेत २५ संघांनी सादरीकरण केले.

रंगमंच क्र. ३ शाहीर अण्णाभाऊ साठे सभागृहात आयोजित प्रहसन, मिमिक्रीतून मनोरंजना सोबत विद्यार्थ्यांनी सामाजिक आणि ज्वलंत विषयावर जेन-झी थेंबाची किंमत, महिला आरोग्य संवर्धन व मासिक पाळी यासह विविध दैनंदिन जीवनातील घटना, सामाजिक परिस्थिती या विषयावर विद्यार्थ्यांनी प्रभावीपणे सादरीकरण करून उपस्थितांची दाद मिळवली. स्पर्धेत ३८ संघांनी सहभाग नोंदविला.

रंगमंच क्र. ४ संत रविदास सभागृहात वादविवाद स्पर्धेत भारतीय लोकशाही जन अंदोलने आणि चळवळी, परिवर्तनाची प्रेरक शक्ती ही राजकीय अस्थिरतेचे कारण या विषयांवर विद्यार्थ्यांनी मुद्देसुद मांडणी करत प्रतिस्पर्धकांच्या मतांचे अचूकपणे खंडण करण्याचे कौशल्य दिसून आले. यात २९ विद्यार्थी सहभागी झाले होते.

रंगमंच क्र. ५ संत गाडगेबाबा सभागृहात चिकट कला, माती कला, स्थळ छायाचित्र या स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांचा कल्पकतेचे पैलू अधोरेखित झाले. चिकट कला स्पर्धेत ३८ विद्यार्थी, स्थळ छायाचित्र स्पर्धेत २९ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

आज होणार सादरीकरण

रंगमंच क्र. १ : महात्मा फुले सभागृह	-	भारतीय लोक समूह नृत्य
रंगमंच क्र. २ : डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृह	-	भारतीय नाट्य संगीत – एकल, भारतीय सुगमसंगीत
रंगमंच क्र. ३ : शाहीर अण्णाभाऊ साठे सभागृह	-	एकांकिका
रंगमंच क्र. ४ : संत रविदास सभागृहात	-	वादविवाद स्पर्धा
रंगमंच क्र. ५ : संत गाडगेबाबा सभागृहात	-	पोस्टर मेकींग, रांगोळी, स्थळ छायाचित्र (अंतीम फेरी) इन्स्टालेशन, मेहंदी

युवारंग महोत्सवात सहभागी विद्यार्थ्यांच्या भावना : युवारंग महोत्सवात एकात्मतेची भावना दिसून आली. मुकनाट्य या कला प्रकारात सहभाग घेतला. इतर संघाच्या सादरीकरणावरून प्रेरणा घेतली व पुढच्या युवारंगात जय्यत तयारी करून पुन्हा स्पर्धेला सामोरे जावू. विद्यापीठात उत्तम अशी भोजनाची व्यवस्था होती. (हर्षदा देवरे, वसंतराव नाईक महाविद्यालय, शहादा,जि. नंदुरबार).

दुष्काळ परिस्थिती असल्यामुळे आयोजकांनी रंगमंचाच्या सजावटीवर कपात केली असली तरी सादरीकरणासाठी रंगमंचाची उत्तम व्यवस्था केलेली दिसून आली. आम्ही आमचे १००% योगदान देवून सादरीकरण केले. या महोत्सवात नवनवीन शिकायला मिळाले (प्रणिता शिंपी, सामाजिक शास्त्रे प्रशाळा कबचौउमवि, जळगाव)

दुष्काळाचे सावट असतांना युवारंग महोत्सव होणार की नाही ? अशी शंका मनामध्ये निर्माण झाली होती. मात्र विद्यापीठाने विद्यार्थ्यांच्या कला गुणांना वाव देण्यासाठी विद्यापीठाने आम्हाला मोठे व्यासपीठ उपलब्ध करून संधी दिली. आयोजकांनी निवास, भोजन आणि आरोग्याची देखील चांगली व्यवस्था केली आहे. (अनिरूध्द लांडगे, आयएमआरडी महाविद्यालय, शिरपूर,जि. धुळे)

॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
'A' Grade
NAAC Re-accredited
(4th Cycle)
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon



जनसंपर्क विभाग

युवारंगाच्या यशस्वीतेसाठी समिती सदस्य सरसावले :

युवारंगाच्या यशस्वीतेसाठी गठीत केलेल्या समिती सदस्यांनी अतिशय सुक्ष्मपणे नियोजन करून सहभागी विद्यार्थ्यांना कुठल्याही प्रकारे अडचणी, समस्या उदभवणार नाही या दृष्टीकोनातून समिती सदस्य कार्यरत असून प्रत्येक सदस्य आपआपली जबाबदारी पार पाडतांना सांघिक कार्याचा नवा आदर्श घालून दिला आहे. विद्यापीठाचे कुलगुरू प्रा.व्ही.एल. माहेश्वरी यांच्या मार्गदर्शनाखाली, प्र-कुलगुरू प्रा. एस.टी. इंगळे, स्वागताध्यक्ष राजेंद्र नन्नवरे, कार्याध्यक्ष ॲड॰ अमोल पाटील, विद्यार्थी विकास समन्वयक समितीचे अध्यक्ष नितीन झाल्टे, कुलसचिव डॉ. विनोद पाटील, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. प्रवीण महाले यांच्यासह आयोजन समिती सदस्य कार्यरत आहेत. या महोत्सवात जळगाव, धुळे व नंदुरबार जिल्ह्यातून ११९ महाविद्यालयांनी सहभाग घेतला. महोत्सवात एकूण २६ कला प्रकारात ४१० विद्यार्थी आणि ६८७ विद्यार्थिनी सहभागी आहेत. तसेच साथसंगत करणारे १३० कलावंत आणि २०० संघ व्यवस्थापक असे एकूण १५०० च्यावर सहभागींसाठी चहा, नाश्ता, भोजन व निवासाची व्यवस्था, सुरक्षा, रंगमंचावरील व्यवस्था तसेच आरोग्य व्यवस्थेसह अन्य २३ समित्या कार्यरत असून यामध्ये विद्यापीठाचे विविध प्राधिकरणाचे सदस्य, अधिसभा सदस्य, प्राचार्य, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी असे एकूण २६० सदस्य युवारंगाच्या यशस्वीतेसाठी परीश्रम घेत आहेत.

.....

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२६ दिनांक: २९ ऑक्टोबर, २०२६

प्रति,
मा.संपादक/प्रतिनिधी,
महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

जनसंपर्क अधिकारी करीता